**C**

**CCE PF**
**UNREVISED**
**FULL SYLLABUS**
**NSR & NSPR**

# ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಪರೀಕ್ಷೆ ಮತ್ತು ಮೌಲ್ಯನಿರ್ಣಯ ಮಂಡಲಿ, ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು – 560 003

# KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD, MALLESHWARAM, BENGALURU – 560 003

**ಎಸ್.ಎಸ್.ಎಲ್.ಸಿ. ಪರೀಕ್ಷೆ, ಮಾರ್ಚ್/ಏಪ್ರಿಲ್, 2023**

**S. S. L. C. EXAMINATION, MARCH/APRIL, 2023**

**ಮಾದರಿ ಉತ್ತರಗಳು**

## MODEL ANSWERS

ದಿನಾಂಕ : 31. 03. 2023 ] **ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M**

Date : 31. 03. 2023 ] **Code No. : 08-M**

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

## Subject : First Language — MARATHI

**(ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಎನ್.ಎಸ್.ಆರ್. & ಎನ್.ಎಸ್.ಪಿ.ಆರ್.)**

**( Private Fresh / NSR & NSPR )**

[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 125

[ Max. Marks : 125

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| I. | **खालील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. त्यापैकी योग्य पर्यायो उत्तर निवडून उत्तरे लिहा :** $10 \times 1 = 10$ | |
| 1. | 'उज्ज्वल' या शब्दाचा संधी विग्रह असा होतो –<br>(अ) उज् + ज्वल (ब) उत् + ज्वल<br>(क) उज्ज्व + ल (ड) उत + ज्वल<br>**उत्तर :** (ब) उत् + ज्वल | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 2. | 'माळ्याने बाग फुलवली.' अधोरेखित शब्दाची विभक्ती लिहा –<br>(अ) चतुर्थी (ब) सप्तमी<br>(क) तृतीया (ड) पंचमी<br>**उत्तर :** (क) तृतीया | 1 |
| 3. | "चिमणी घरटे बांधत होती." या वाक्यातील काळ ओळखा –<br>(अ) अपूर्ण वर्तमानकाळ (ब) अपूर्ण भूतकाळ<br>(क) पूर्ण भूतकाळ (ड) अपूर्ण भविष्यकाळ<br>**उत्तर :** (ब) अपूर्ण भूतकाळ | 1 |
| 4. | खालीलपैकी कर्मणी प्रयोगाचे उदाहरण हे आहे –<br>(अ) मी पुस्तक वाचतो (ब) तो पुस्तक वाचतो<br>(क) तिने पुस्तक वाचले (ड) ती पुस्तक वाचते<br>**उत्तर :** (क) तिने पुस्तक वाचले | 1 |
| 5. | बुडत्याला .................. म्हण पूर्ण करा.<br>(अ) जहाजाचा आधार (ब) डब्याचा आधार<br>(क) ओंडक्याचा आधार (ड) काडीचा आधार<br>**उत्तर :** (ड) काडीचा आधार | 1 |
| 6. | 'प्रेतापुढे हातात धरलेले शिंकोळे.' या शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा –<br>(अ) डेरा (ब) हंडा<br>(क) टिटवं (ड) तांब्या<br>**उत्तर :** (क) टिटवं | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 7. | 'मोबाईल' हा शब्द कोणत्या भाषेतून आला आहे ?<br>(अ) इंग्रजी (ब) संस्कृत<br>(क) फारसी (ड) कन्नड<br>**उत्तर :** (अ) इंग्रजी | 1 |
| 8. | 'राणी' या शब्दाचे लिंग कोणते ?<br>(अ) पुल्लिंगी (ब) स्त्रीलिंगी<br>(क) नपुंसकलिंगी (ड) उभयविध<br>**उत्तर :** (ब) स्त्रीलिगी | 1 |
| 9. | 'स्वल्पविराम' साठी खालीलपैकी कोणते चिह्न वापरतात ?<br>(अ) , (ब) .<br>(क) ? (ड) !<br>**उत्तर :** (अ) , | 1 |
| 10. | "तू खेळावयास येणार का ?" या वाक्याचा प्रकार कोणता आहे ?<br>(अ) होकारार्थी (ब) नकारार्थी<br>(क) प्रश्नार्थी (ड) विधानार्थी<br>**उत्तर :** (क) प्रश्नार्थी | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| II. | **पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा :** $5 \times 1 = 5$ | |
| 11. | ज्ञानप्रकाश : षष्ठी तत्पुरुष : : क्षणाक्षणाला : ............... <br> **उत्तर :** अव्ययीभाव समास | 1 |
| 12. | सुंदर : विशेषण : : हिमालय : ............. <br> **उत्तर :** नाम ( विशेषनाम ) | 1 |
| 13. | आर्जव : विनवणी : : भास्कर : ................. <br> **उत्तर :** सूर्य, रवी, भानू, सविता, रष्मी | 1 |
| 14. | सफल : असफल : : दुःख : ...................... <br> **उत्तर :** सुख | 1 |
| 15. | नेनंता गुराखी : इंद्रजीत भालेराव : : धरण : ................... <br> **उत्तर :** दया पवार | 1 |
| III. | **खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :** $8 \times 1 = 8$ | |
| 16. | चिं. वि. जोशीनी मराठी साहित्यात कोणती दोन पात्रे लोकप्रिय केली ? <br> **उत्तर :** चिमणराव आणि गुंड्याभाऊ | 1 |
| 17. | 'वाटणी' या कथेचे मूल्य कोणते ? <br> **उत्तर :** सामाजिक समस्या | 1 |
| 18. | 'वाटणी' कथेचे लेखक कोण ? <br> **उत्तर :** रा. रं. बोराडे | 1 |
| 19. | रुक्मिणी श्रीकृष्णाबरोबर कोणत्या पद्धतीने विवाह करू इच्छिते ? <br> **उत्तर :** राक्षस पद्धतीने | 1 |
| 20. | रुक्मिणी लग्नाआधी कोणाचे दर्शन घेण्यास जाणार आहे ? <br> **उत्तर :** कुलदेवतेचे | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 21. | 'पाठ आणि पोट यांचा झाला टाळ' या कवितेचा साहित्यप्रकार कोणता ?<br>**उत्तर :** नवकाव्य | 1 |
| 22. | भुकेलेल्या पोटांना काय वर्ज्य नाही ?<br>**उत्तर :** देवरक्त | 1 |
| 23. | महानुभाव पंथाचे संस्थापक कोण आहेत ?<br>**उत्तर :** चक्रधरस्वामी | 1 |
| IV. | **खालील प्रश्नांची उत्तरे सूचनेप्रमाणे लिहा :** $3 \times 2 = 6$ | |
| 24. | खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.<br>अ) गुत्तं घेणे ब) काळाला जिंकणे.<br>**उत्तर :** वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :<br>अ) गुत्तं घेणे – ठेका घेणे. 1<br>ब) काळाला जिंकणे – मृत्युवर विजय मिळवणे. 1<br>( वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग व्हावा, अर्थाचा नव्हे )<br>( अर्थ सांगणे $\frac{1}{2}$ गुण, वाक्यात उपयोग $\frac{1}{2}$ गुण ) | 2 |
| 25. | अलंकार ओळखून लक्षणे लिहा.<br>'शीलाची किंमत शिक्षणाहून अधिक आहे.'<br>**उत्तर :** अलंकार ओळखून लक्षणे लिहा.<br>**व्यतिरेक अलंकार :** 1<br>उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ दाखवले जाते. तेव्हा व्यतिरेक अलंकार होतो. 1 | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 26. | गण पाडून वृत्त ओळखा.<br><br>पावेन पाय शिवही नमितो जयाते.<br>**उत्तर :** गण पाडून वृत्त ओळखा<br>पावेन पाय शिवही नमितो जयाते.<br>पावेन \| पायशि \| वहीन \| मितोज \| याते<br>– – U \| – U U \| U – U \| U – U \| – –  1<br>त \| भ \| ज \| ज \| ग ग<br>वत्त –<br>वसंततिलका<br>**लक्षणे :** 1<br>अक्षरे – 14<br>गण – त, भ, ज, ज, ग, ग,<br>यती – 8 व्या व 14व्या अक्षरावर | 2 |
| V. | **खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा :**<br>12 × 2 = 24 | |
| 27. | जपानच्या प्रगतीला कोणत्या दोन गोष्टी कारणीभूत होत्या ?<br><br>**उत्तर :**<br><br>जपानच्या प्रगतीला 1819 साली झालेला भूकंप आणि दुसरा हिरोशिमावर 1945 साली झालेला बॉम्ब हल्ला. या दोन गोष्टी कारणीभूत होत्या. | 2 |
| 28. | बांबूच्या झाडाला फुले केव्हा येतात ? राखीने दिलेले झाड का वाढत नव्हते ?<br><br>**उत्तर :** बांबूच्या वनाचा नाश व्हायची वेळ येते तेव्हा बांबूला फुलं येतात.<br><br>कारण राखीने दिलेल्या झाडाशी बोललं तरचं ते झाड वाढते. ही बंगाली परंपरा आहे. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 29. | विरहिणी म्हणजे काय ?<br>**उत्तर : विरहिणी** – देवाच्या विरहाने आर्त झालेल्या भक्ताच्या अवस्थेचे वर्णन, भक्त स्वतःला प्रेयसी आणि देवाला प्रियकर समजतात. | 2 |
| 30. | "माझी काही एकादशी नि दुप्पट खाशी अशातली गत नाही."<br>संदर्भासह स्पष्टीकरण करा.<br>**उत्तर : संदर्भ :** पाठाचे नाव – नोकर ? छे, मालक !<br>लेखक – चिं. वि. जोशी<br>काकूने लेखकांना उद्देशून म्हटले आहे.<br>**स्पष्टीकरण :** काकूंची एकादशी, दाणे, साबुदाणे खजूर, आणून ठेवतात, लिटरभर दूध गवळ्यास आणण्यास सांगितले, काकूंचे एकादशी पुराण सुरु. | 2 |
| 31. | लेखक परिचय लिहा – अनंत काणेकर.<br>**उत्तर : लेखक परिचय –** अनंत काणेकर<br>अनंत आत्माराम काणेकर ( 1905 - 1980 )<br>पुरोगामी विचाराचे कवी, लेखक.<br>**कवितासंग्रह –** चांदरात, इतर कविता, विडंबने.<br>**लघुनिबंध –** शिंपले आणि मोती, तुटलेले तारे पिकली पाने.<br>**प्रवासवर्णन –** धुक्यातून लाल ताऱ्याकडे, आमची माती आमचे आकाश.<br>**कथासंग्रह –** मोरपिसे, रूपेरीवाळू<br>**नाटक –** निशिकांताची नवरी.<br>1957 औरंगाबाद साहित्य संमेलनाचे अध्यक्ष. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 32. | ''पिसारा प्रभेचा उभारून दारी पहाटे उभा शुक्र हा प्रेमळ.'' संदर्भासह स्पष्टीकरण करा.<br>**उत्तर : संदर्भ :** कवितेचे नांव – 'पृथ्वीचे प्रेमगीत'<br>कवी – कुसुमाग्रज<br>**स्पष्टीकरण :** पृथ्वीला मोहवून टाकण्याचा अनेक ग्रहांचा प्रयत्न, पहाटे प्रभेचा पिसारा उभारून शुक्र उभा दारी, प्रीतीची याचना करताना मंगळ लाल झाला. | 2 |
| 33. | परिचय लिहा – प्र. के. अत्रे.<br>**उत्तर : परिचय** – प्र. के. अत्रे<br>प्रल्हाद केशव अत्रे ( 1898 - 1969 )<br>कवी, नाटककार, दिग्दर्शक, प्राध्यापक, पत्रकार वक्ता, विडंबनकार, 1942 नाशिक मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.<br>**नाटक** – मी उभा आहे, लग्नाची बेडी, भ्रमाचा भोपळा, उद्याचा संसार, साष्टांग नमस्कार, तो मी नव्हेच.<br>**आत्मचरित्र :** कऱ्हेचे पाणी<br>**विडंबन :** झेंडूची फुले | 2 |
| 34. | दुकानदाराला आश्चर्य का वाटले ?<br>**उत्तर :** कारण दुकानदाराच्या मते ती छत्री घेतली तर संबंध पाणी अंगावर येईल. असे त्याचे मत होते. म्हणून दुकानदाराने ती छत्री घेऊ नका असे सांगितले असताना सुद्धा त्या छत्रीची निवड लेखक करतात म्हणून आश्चर्य वाटते. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 35. | ज्योतिबांनी सावित्रीबाईंना कशा तऱ्हेने शिकवले ?<br>**उत्तर :** ज्योंतीबानी नगरहून येताना पाटी, पेन्सिल घेऊन आले, आणि पाटीवर लिहले "शे-ट-जी" व गिरवण्यास सांगितले. त्यानंतर त्यांनी क-ख-ग-घ, त-थ-द-ध, वेलांटी, उकार, पाढं, हिशेब सर्व शिकवले. | 2 |
| 36. | माळावरच्या थळोबावर लेखकाचा विश्वास का नव्हता ?<br>**उत्तर :** कारण रात्रंदिवस राबणाऱ्या आणि असंख्य वेळा पाणी पिऊनच भूक मारणाऱ्या अक्काच्या मदतीला कोणतेच देव येत नव्हते. उलट देवांनाच नारळ, नैवेद्य लागत असे. | 2 |
| 37. | लोकसाहित्यात माहेरचा दूत कोणाला म्हणतात ? कवी कोणाशी बोलत आहे ?<br>**उत्तर :** लोकसाहित्यात माहरचा दूत कावळयाला म्हटले आहे. कवी कावळ्याशी बोलत आहे. | 2 |
| 38. | भुके जीव काय काय करतील असे कवी म्हणतो ?<br>**उत्तर :** भुके जीव दाही दिशांना सैरावैरा धावतील, एकमेकांना मारून खातील. जर विठ्ठल समोर आलाच तर त्याचे रक्तही प्राशन करतील. विठ्ठलाने आपले देवपण सिद्ध केले नाही तर डोक्यात घणही घालतील. | 2 |
| VI.<br><br>39. | **खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा :** $1 \times 3 = 3$<br>अ) 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी.'<br>**किंवा**<br>ब) 'वाचाल पुस्तक तर घडेल मस्तक.'<br>**उत्तर :** कल्पनाविस्तार ( उत्तराचे मुद्दे ) :<br>i) कल्पनेचा अर्थ सांगणे (शब्दशः अर्थ) 1<br>ii) उदाहरण व स्पष्टीकरण $1\frac{1}{2}$<br>iii) तात्पर्य $\frac{1}{2}$ | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| VII. | **खालील प्रश्नांची उत्तरे पाच-सहा वाक्यात लिहा :** $13 \times 3 = 39$ | |
| 40. | ‘अनंतशक्तिः परमेश्वरू’ या कथेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.<br>**उत्तर :** गावात हत्ती आला, जन्मांध पहायला, एकाने पाय, एकाने सोंड, एकाने कान, पाठ, शेपूट पाहिली, एकमेंकाना विचारले, पाय पाहिला तो हत्ती खांबासारखा, सोंड पाहिलेला, हत्ती मुसळासारखा कान पाहिलेला हत्ती भिंतीसारखा, पोट पाहिलेला हत्ती कोथळ्यासारखा, शेपूट पाहणारा हत्ती खराट्यासारखा, एकमेंकाना विरोध, एकजण डोळस, तो हत्तीचा अवयव, हत्ती नव्हे, सर्व अवयवांनी युक्त तो हत्ती होय. | 3 |
| 41. | बालपरवेशी व नानापरवेशी म्हणजे काय ?<br>**उत्तर : बालपरवेशी –** लढाईत मरण पावलेल्या सैनिकांच्या मुलाच्या संगोपनासाठी दिलेला बैठा पगार, जमिन इत्यादी. $1\frac{1}{2}$<br>**नानापरवेशी –** लढाईत मरण पावलेल्या सैनिकांच्या संततिहीन पत्नीस तिच्या निर्वाहापुरता दिलेला पगार, जमीन इत्यादी. $1\frac{1}{2}$ | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 42. | आई-बाबा मुलांना शाळेत का पाठवित नसत ? शिक्षणामुळे मुलांच्यात कोणता बदल झाला होता ?<br>**उत्तर :** कारण मुलं शाळत गेली तर, गुराढोरांचे कोण बघेल ? शेतात कोण राबेल ? स्वयंपाकासाठी कोण बघेल ? असे त्याचे प्रश्न होते. म्हणून ते मुलांना शाळेत पाठवत नसत. $1\frac{1}{2}$<br>शिक्षणामुळे शेतात काम करण्यास लाज वाटे, शिक्षणाच्या जोरावर अर्थाजन करण्याची क्षमता नव्हती, बदल झाला तो बाह्य पोशाखात, अर्धी चड्डी, गंजीफ्रॉक, जीनची पँट, पूर्ण बाह्याचा शर्ट, तोंडात गुटखा, डोळ्यावर गाँगल, मोलमजुरी करून चैनी हा बदल झाला. $1\frac{1}{2}$ | 3 |
| 43. | 'क्रांतीज्याती सावित्रीबाई' या पाठाच्या आधारे 'सावित्रीबाई फुले' यांच्या गुणांचे वर्णन करा.<br>**उत्तर :** **सावित्रीबाई फुले –**<br>जन्म नायगाव, सातारा जिल्हा, नेवासे पाटलांची लेक, पुण्याच्या फुल्यांशी लग्न, लहानपणी सागरगोटे, काचाकवड्याचा खेळ, ज्योतीबांनी लिहायला, वाचायला शिकवले, मुलींच्या शाळेत शिक्षिका म्हणून काम, पतीच्या प्रत्येक कामामध्ये साथ, त्यांना समाजाविषयी तळमळ होती. शिक्षणा-विषयी प्रेम, त्याग या गुणाचे दर्शन, शिक्षणासाठी शिव्या खाल्या, वर्गात नीतीबोधवाचन, बेरीज – वजाबाकी, भूगोल, मराठ्यांचा इतिहास शिकवला. शूद्र बाई शिक्षिका म्हणून गावात चर्चा, कुणी छेड काढे, थुकायचे, खाकरायचे, दोघा-चोघानी अडवलं, ज्योंतीबाची महायात्रा. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 44. | आक्काला अण्णांनी काय करावे वाटत असे ? आणि का ? लेखक कोणते दिवास्वप्न पहात असे ?<br>**उत्तर :** अण्णानं दारू सोडावी, रोज कामाला जावे, पैसे मिळवावेत, असे आक्काला वाटत असे.<br>लेखकाना चांगली नोकरी लागेल, आक्काला भारी लुगडं घेईन, अण्णाला चाकरीतून मुक्त करेन, आक्काला कमलाही त्रास होऊ देणार नाही, खायचं निवांत बसायचं, घर बांधेन. | 3 |
| 45. | धर्माच्या नावाखाली ढोंगी गुरु काय काय करतो ?<br>**उत्तर :** गुहेमध्ये जप, कपाळावर टिळा, डोक्यावर जटा, भगवी वस्त्र परिधान, डोक्यावर टोपी, डोक्याचे मुंडण, दंड कमंडलू घेऊन कठिण तपश्चर्या करतात. होमामध्ये तीळ, तांदूळ, तूप, पशूच्या वपा जाळतात. | 3 |
| 46. | 'गाऊ त्यांना आरती' या कवितेमध्ये कवी यशवंत कोणाकोणाचा गुणगौरव करू इच्छितात ? स्पष्ट करा.<br>**उत्तर :** कवी युद्धभूमीवरील संकटाला सामोरे जाणारे योद्धे, राष्ट्रचक्रोद्धारासाठी जीव अर्पण केलेले सैनिक, कृष्णाप्रमाणे सारथ्य करीत मार्गदर्शन करणारे, स्वार्थ हेतूला संक्षेप देणारे संत, देश ज्याचा देव आहे ते देशभक्त, मार्कंडेयाप्रमाणे काळावर विजय मिळवणारे, सौभद्राप्रमाणे प्राणांची आहुती देणारे सैनिक, लोकसेवा करणाऱ्या समाजसेवकाचा गौरव करतात. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 47. | 'नेनंता गुराखी' या कवितेचा आशय तुमच्या शब्दात लिहा.<br>**उत्तर :** चिखलाची गाय हातामधून गेली, हातामध्ये काठी आली, लहानसा जीव खंडीभर गुरामागे जीवाची आग, गाईची पाठ बडविली, जीव रंजीस हातपाय गळले, आई जात्यावर ओवी स्चत. गुराखी म्हशीच्या पाठीवर बसतो. गुराखी काटाकुपाटात जातो, निबरले पाय, पावसात गाईच्या पोटाशी उभा, गुराखी भागून-शिणून जातो, गुराखी कृष्ण झाला नाही. | 3 |
| 48. | 'धरण' कवितेतील स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे ?<br>**उत्तर :** धरण बांधते, मरण कांडिते, पहाटेच्या वेळी पीठ जात्यात अडकल. कणी-कोंडा, रांधते, दिस कासऱ्याला आला, जीव घोटाळतो. लहान मूल पाटीखाली घालते, उन्हात दगड फोडते. पायाला पान बांधते. घोटभर पाण्यासाठी रान धुंडाळिते. | 3 |
| 49. | 'सुन्या तिच्याही दाही दिशा' या कवितेचा भावार्थ लिहा.<br>**उत्तर :** भरदुपारी डोक्यावर पाण्याचा हंडा, पाणी वाहणाऱ्या बायांची रांग, सगळेच ऋतू न संपणाऱ्या कष्टांची माळ, फुफाटया चाकोऱ्यांतून चालताना वाटते फिटेल पांग, रसरसून तेजाळते, दुःखाची ज्योत, असह्य ठणका, हळदीच्या वाटीचे बळ, घुसमटणारा जीव, समृद्ध विहिरीचा तळ, अनाठायी आयुष्य, बोच घेरत नाही, वाळूमघल्या झिऱ्यासारखा जीवनरस, पारू, राही कणी पाखडून सत्व उचलण्याची सवय, दुःख पुरून ठेवतात, तांब्याभर पाण्याचा विसावा. पायाला पानं, बांधणारी आई, संसाराचा वणवा. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 50. | क्लबच्या पार्टीत कोणकोण स्त्रिया आल्या होत्या ? त्या पार्टीचे सविस्तर वर्णन करा.<br>**किंवा**<br>जपानमध्ये कोणते निरूद्योगी प्रकार आढळत नाहीत ? जपानमधील मुली कोणकोणती कामे करतात ?<br>**उत्तर :** लेखिका कमीज खाँ बराबर टोकिओमधील क्लब पार्टीस गेल्या, त्यामध्ये काही प्रतिष्ठित पुरुषमंडळी होती, मध्यभागी पिंगपाँगसारखं मोठ टेबल होतं, दोन्ही कोपऱ्यात झगझगीत प्रकाशात मोठमोठे कॅमेरे स्टँडवर उभे होते. टेबलावर खाद्य पदार्थ, पेये, पार्टीस राजकन्या, प्रसिद्ध नटी, गायिका, कवयित्री, कादंबरीकार, लघुकथालेखिका अशा स्त्रिया होत्या, राजकन्या नम्र, त्याच्या बोलण्या वागण्यात दिमाख नव्हता.<br>**किंवा**<br>जपानमध्ये रस्त्यात उगीचच घोटाळत उभं राहून मुलींची चेष्टा करणं, त्यांना त्रास देणं या सारखे निरूद्योगी प्रकार घडत नसे.<br>जपानमध्ये मुली हॉटेल चालवणं, कप विसळणं, डब्यात जेवणाचे कागदी डबे विकणं ट्रॅम कंडक्टर, बस कंडक्टर, दुकानातील विक्रेत्या, हॉटेलमध्ये वाढपी, लिफ्टमन अशी कामे करतात. | 3 |
| 51. | श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रुक्मिणी काय करणार आहे ?<br>**उत्तर :** श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रुक्मिणी जीभ हासडून जीव देणार आहे, व पुढे शंभर जन्म घेऊन उग्र तपश्चर्या करून श्रीकृष्णाला मिळवणार आहे. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 52. | पृथ्वी-सूर्य यांचा संवाद कवितेच्या आधारे तुमच्या शब्दात लिहा.<br>**उत्तर :** पृथ्वी सूर्याला म्हणते को युगामागुनी युगे चालली भास्करामी कितीवेळ वंचना सहन करू, तुझ्या कक्षेत किती काळ घावू. कितीदा प्रोतीची याचना करू, माझ्या अंगामध्ये आता तारूण्यातील उमाळे, उसासे नाहीत, तेव्हढी आग अंगात राहीलेली नाही, आता तारूण्य संपले आहे आणि काळजात काजळीचे कोपरे उरले आहेत. तरीही मी अविश्रांतपणे तुझ्या पाठीमागून फिरत आहे. | 3 |
| VIII. | **खालील प्रश्नांची उत्तरे आठ-दहा वाक्यात लिहा :**<br>$4 \times 4 = 16$ | |
| 53. | 'विद्या आणि शील' या गुणाबद्दल आंबेडकर काय म्हणतात ?<br>**उत्तर :** विद्या पहिले दैवत, विद्येशिवाय शांतता नाही, माणुसकी नाही, विद्या महासागरासारखी, माणसाला जगायला अन्नाची गरज त्याप्रमाणे विद्येचेही ज्ञानाशिवाय माणूस काहीही करू शकणार नाही. अपार वेदना, त्रास सोसून विद्या संपादन, विद्येचे भयंकर वड, मनुष्य पुस्तकावर प्रेम करील तेंव्हा विद्येचा पुजारी. 2<br>शीलाशिवाय विद्या फुकाची आयुष्यात फसवणूक, पाप केले नाही, विद्येचे शस्त्र, तो शीलवान असेल तर संरक्षण, शील नसेल तर घात, चातुर्य व बुद्धीला सदाचाराची जोड मिळाली तर लबाडी, फसवाफसवी करू शकणार नाही, शीलाशिवाय लोक निपजू लागले तर समाजाचा, राष्ट्राचा नाश, शीलाची किंमत शिक्षणापेक्षा अधिक. 2 | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 54. | गंगूबाईंनी संगीत शिकण्यासाठी कशाप्रकारे कष्ट घेतले ? त्यांची गुरुनिष्ठा कोणत्या प्रसंगातून दिसून येते ?<br>**किंवा**<br>बेळगावी काँग्रेसमधील घटनांचे सविस्तर वर्णन करा.<br>**उत्तर :** लहानपणापासून गाण्याचा रियाज, घसा दुखू लागला गाणे थांबवले नाही, गळयावर शस्त्रक्रिया, आवाज बदलला, खचल्या नाहीत, किराणा घराण्यात पदार्पण, कुंदगाळला शिक्षण, शेतवाडी अंधार पडे, तरीही शिक्षण, पहाटे खर्जाचा रियाज.<br>सवाई गंधर्वाचा मुलगा आजारी राहण्यासाठी दोन खोल्या दिल्या, आपल्या मुलीस शिकवण्यासाठी 50 रु० फी दिली.<br>**किंवा**<br>1924 मध्ये बेळगांवी काँग्रेस अधिवेशन, स्वागतगीत गाण्याची संधी, राष्ट्रीय नेते, पहावयास मिळणार म्हणून आनंद, स्वागतगीत शिकवण्यासाठी म्हैसूर मधून शिक्षक, व्यासपीठावर गांधीजी, नेहरू, जीना, देशपांडे, स्वागतगीत उत्तम, गांधीजी कडून शाबासकी, जातीवरून अपमान होईल असे भय, मात्र कोणीच विचारले नाही, जेवणाच्या पंक्तीतून उठवतील अशी भीती, पण तसे घडले नाही, ती घटना दीर्घकाळ स्मरणात. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 55. | 'सत्कार' कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.<br>**किंवा**<br>हिरव्या तृणपात्याचा सत्कार का व कसा करण्यात आला ते लिहा.<br>**उत्तर :** पहिल्या हिरव्या तृणपात्याचा सत्कार, ज्वालारस उरावर झेलले, धरतीने दारूण तप केले, नद्या म्हणाल्या विश्वसंहार, धरतीच्या पोटी, बीजाच्या ओठी स्फुरली श्रद्धेची ललकार, भूमिचे कवच भेदून हिरवे कौतुक बाहेर आले आणि नचिकेताचे स्वप्न साकार झाले, त्यावेळी मातीची मृत्युवर मात झाली, ता सृजनाचा विजयध्वज आहे. जीवनसाक्षात्कार आहे, त्यावेळी ढगांनी मुजरा केला, खगांनी स्वागतगीत म्हटले, लाल मातीचा गुलाल उघळीत पवनने सचार केला, त्यावेळी दक्षिण-उत्तर सर कोसळली, मातीत्न अत्तर घमघमले, अष्ट दिशांतून अभीष्टचिंतन झाले व सगळीकडे जयजयकार झाला.<br>**किंवा**<br>कारण हिरव्या तृणपात्याने उरावर ज्वालारस झेलले धरतीने दारूण तप केले, विश्वसंहार झाला, बीजाच्या पोटी श्रद्धेची ललकार, अचानक हिरवे कौतुक आले, नचकिताचे स्वप्न साकार, मातीची मृत्युवर मात, खगांनी स्वागतगीत, ढगांनी मुजरा, लाल मातीचा गुलाल उघळीत पवन संचार, कोसळली सर दक्षिण-उत्तर, मातीतून अत्तर, अष्ट दिशांतून अभीष्टचिंतन. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 56. | खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा :<br><br>या भारतात ......................................<br><br>.......................................................<br><br>...................................... हो इस्लामी.<br><br>**किंवा**<br><br>खलनिंदका मनीही ..............................<br><br>............................................. बावरी<br><br>.............................. दे वरचि असा दे.<br><br>**उत्तर :** या भारतात बंधुभाव नित्य वसू दे, दे वरचि असा दे<br>हे सर्वपंथ संप्रदाय एक दिसू दे, मतभेद नसू दे<br>नांदोत सुखे गरीब अमीर एक मतानी<br>मग हिंदू असो, ख्रिश्चन वा हो इस्लामी.<br><br>**किंवा**<br><br>खलनिंदका मतीही सत्य, न्याय वसू दे, दे वरचि असा दे<br>सौंदर्य रमो घराघरात स्वर्गियापरी<br>हो नष्ट होऊ दे, विपत्ती, भीती बावरी<br>तुकड्यास सदा या, सेवेमाजी वसू दे, दे वरचि असा दे | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| IX. | **खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :** $1 \times 4 = 4$ | |
| 57. | महात्मा फुले म्हणतात, ज्याचे मन सत्याने पवित्र झाले आहे, तो जगातील सर्वात पवित्र माणूस. ज्या मनुष्याला मनाच्या पावित्र्याचे महत्व कळत नाही, तो मनुष्य धरणीस भार ठरतो. निर्दोषी आणि उद्योगी जीवन मनुष्याला आरोग्य नि संपत्ती देते. आळशी मनुष्य हा दुष्ट असतो. तो समाजाचा शत्रू बनतो. तो कधीही सुखी होत नाही. उद्योगी आणि शुद्ध चरित्र्याचा मनुष्य हा गरिबांचा वाली असतो. तो अनेकांना सुखी करतो. सत्यप्रेमी, निर्मळ मन आणि शांत हृदय यांतून धैर्य निर्माण होते. धैर्यशील मनुष्य हालअपेष्टा सहन करतो आणि संकटावर मात करतो. | |
| | **प्रश्न :** | |
| | अ) मनुष्याला आरोग्य व संपत्ती कशामुळे मिळते ? 2 | |
| | ब) धैर्यशील माणूस कसा ओळखावा ? 2 | |
| | **उत्तर :** | |
| | अ) निर्दोषी आणि उद्योगी जीवन मनुष्याला आरोग्य आणि संपत्ती देते. 2 | 4 |
| | ब) धैर्यशील मनुष्य हालअपेष्टा सहन करतो आणि संकटावर मात करतो. 2 | |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| X. | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा :** $1 \times 5 = 5$ | |
| 58. | मोबाईलचे व्यसन सुटण्यासाठी लहान भावाला मार्गदर्शन करणारे पत्र लिहा.<br>**किंवा**<br>तुमच्या शाळेतील स्नेहसंमेलनासाठी प्रमुख पाहुण्यांना निमंत्रण देणारे पत्र लिहा.<br>**उत्तर : पत्र :**<br>i) प्रेषक पत्ता (पाठविणाऱ्याचा पत्ता व दिनांक) 1<br>ii) मायना 1<br>iii) विषय मांडणी व भाषा सजावट 2<br>iv) समारोप व स्वाक्षरी $\frac{1}{2}$<br>v) कोणाला पत्र पाठवावयाचे त्याचा पत्ता $\frac{1}{2}$ | 5 |
| | **किंवा**<br>**अर्ज :**<br>i) प्रेषक पत्ता (पाठविणाऱ्याचा पत्ता ठ तारखेसह) 1<br>ii) मायना ( अधिकाऱ्याचा हुद्दा ) 1<br>iii) विषय $\frac{1}{2}$<br>iv) मजकूर 2<br>v) सही व पत्ता $\frac{1}{2}$ | 5 |
| XI. | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा :** $1 \times 5 = 5$ | |
| 59. | अ) मी स्वातंत्र्य सैनिक बोलतोय.<br>ब) माझे बाबा<br>**उत्तर :** निबंधलेखनाचे मुद्दे :<br>i) आकर्षक प्रारंभ 1<br>ii) विषयज्ञान 2<br>iii) भाषा सौंदर्य 1<br>iv) शेवट 1 | 5 |